# परिशिष्ट १

इ.सन २००० ते २००६ या कालावधीत प्रबंधकर्ती विधानपरिषदेच्या आमदार होत्या, त्या काळात प्रबंधकर्तीस जो अनुभव आला तो, त्यांना प्रबंधाच्या रूपाने लिखित स्वरूपात समोर आणायचा आहे. प्रबंधकर्ती स्वतः ४० वर्षांपासून राजकारणात आहेत, नगरपालिका महानगरपालिका, जिल्हापरिषदा, विधानसभा, लोकसभा, निवडणूकांची जबाबदारी त्यांनी पेललेली आहे. निवडणूकांचे तंत्र व मंत्र त्यांना चांगले अवगत आहे.

त्या स्वतः २००० जुलैमध्ये विधानसभेच्या सदस्यांनी निवडून द्यायच्या कोट्यातून आमदार म्हणून निवडून आल्या होत्या. २००६ पर्यंत ६ वर्ष त्या विधानपरिषदेच्या आमदार राहिल्या आहेत. अनेक महत्त्वाच्या शासकीय कमिट्यांवर त्यांनी काम केले आहे. २००९ ला त्यांनी स्वतः बारामती लोकसभा मतदार संघात लोकसभेची निवडणूक लढविली आहे. अचानक त्या ठिकाणी मुंबईहून जाऊन निवडणूक लढवूनही त्यांना १,५०,००० मते मिळाली होती. विधानपरिषदेतील सदनाचा त्यांना त्या ठिकाणी चांगला उपयोग झाला.

देशातल्या इतर राज्यांमध्येही त्या प्रचारासाठी जात होत्या, अजूनही जातात, उदा. गोवा, राजस्थान, गुजरात, हिमाचल, कर्नाटक, आसाम, उत्तरप्रदेश, मणीपूर, उत्तरांचल, मध्यप्रदेश, छत्तीसगढ या सर्व राज्यांमध्ये त्यांनी विधानसभा व लोकसभा निवडणूकीचे काम केले आहे. त्यामुळे व्यक्तिमत्वाचाही अभ्यास त्यांच्याकडे आहे. निरीक्षण कला काही प्रमाणात अवगत आहे.

एम.ए.,एम.फिल केल्यामुळे साहित्याशी त्यांचा जवळचा संबंध आहे. वाचन लिखाणाची आवड आहे.

विधानपरिषदेत काम करत असताना, त्या पूर्णवेळ सभागृहात बसायच्या. सर्व सदस्यांची भाषणे मनःपूर्वक ऐकायच्या विधानसभेतील भाषणे ऐकण्यासाठी त्या मोकळ्या वेळात विधानसभेच्या गॅलरीत जाऊन बसायच्या व त्या सदनातील चर्चा, भाषणे ऐकायच्या. दिल्लीला जेव्हा जातात तेव्हा लोकसभा, राज्यसभेतील भाषणे सुद्धा त्यांनी त्या त्या सभागृहांच्या बाल्कनीत बसून ऐकली आहेत. एकाच राजकीय पक्षाचे काम त्या राष्ट्रीय स्तरावर गेली दोन दशके करत आहेत. महिला आघाडीचे काम प्राधान्याने त्यांनी केले आहे. त्यामुळे त्या त्या राज्यातील विधानसभा विधानपरिषदांच्या कामकाजाचा आढावा त्यांनी घेतला आहे. विधानसभा, लोकसभा, विधानपरिषदांच्या महिला सदस्यांचे मेळावे त्यांनी घेतले आहेत.

महाराष्ट्र विधानसभा व विधानपरिषदेतील महिला आमदारांच्या भाषणांबाबत त्या चांगल्या परिचित आहेत. विधिमंडळातील वाचनालयात नियमित जाऊन त्या ६ वर्षांच्या काळात आधीच्या काळातील महिला आमदारांची भाषणे त्या सतत वाचत असत, त्या संदर्भांचा त्या आपल्या भाषणात उपयोग करत असत.

या सर्व अनुभवांचा परिपाक म्हणून त्यांना विधिमंडळातील महिला आमदारांच्या भाषणावर प्रबंध लिहिण्याचा संकल्प त्यांनी केला. सभागृहात शेतकरी कुटुंबातून आलेली महिला आमदार म्हणून विविध विषयांकडे ती कशी पहाते, कसा विचार करते, ती स्वतः अभ्यास करून बोलते का? हे त्या निरखित असत. तद्वतच कायद्यांचा अभ्यास केलेल्या महिला आमदार कशा बोलतात त्यांचा दृष्टिकोन कसा असतो? त्या आपली मते वकील म्हणून कायद्याच्या चौकटीतून कशा मांडतात हेही त्यांनी अभ्यासिले आहे. मग राजकीय घराण्यातील वारस म्हणून पुढे आलेली महिला, शिक्षिका, प्राध्यापिका महिला आमदार या विविध स्तरातून आलेल्या महिला आमदारांच्या दृष्टिकोनात थोडाफार फरक त्यांना आढळला. परंतु संवेदनशीलता, मातृत्वाचा ओलावा प्रत्येकीच्या भाषणात त्यांना आढळला. महिलेची भूमिका कौटुंबिक किंवा सामाजिक  जीवनात समन्वयाची असते. ती या भाषणांमधून प्रकट झालेली त्यांना आढळली.

सर्व विषयांवर महिला आमदारांनी आपली मते सभागृहात मांडली आहेत. मग ती कायदा सुव्यवस्था, शेतीविषयक प्रश्न, पाणी प्रश्न, महागाई, देशाची सुरक्षा, महिलांवर होणारे अन्याय, अत्याचार, शैक्षणिक धोरणे प्राथमिक ,माध्यमिक, विद्यापीठ याचे विषय, कार्यपद्धती यावर त्यांनी सूचक भाषणे केलेली आहेत. अनेक सामाजिक प्रश्नांना न्याय देण्याचा प्रयत्नही त्यांनी केलेला दिसून येतो. ग्रामीण व शहरी भागाची तुलना, तिथल्या सोयी-सुविधा, अन्नधान्याचा तुटवडा, एस.टी, टॅक्सी, आगगाड्या अशा सर्वच वाहनांची अवस्था, त्यांची सेवा, शर्ती याचाही अभ्यास, कामगार त्यांच्या मागण्या, संपाची कारणे, वाढणाऱ्या प्रदूषणावर उपाययोजनाही  त्यांनी सुचविल्या आहेत. शोकप्रस्तावावरची  किंवा अभिनंदनपर भाषणेसुद्धा महिलांनी प्रभावीपणे केलेली आढळतात. काही ठिकाणी त्यांनी तुलनात्मक अभ्यासही केला आहे.

महिला आमदारांची भाषा साहित्याच्या जवळ जाणारी वाटली, त्यामुळे महाराष्ट्र विधिमंडळातील महिला आमदारांच्या भाषणांचा मराठी साहित्य-संस्कृती वाङ्मयाच्या दृष्टीनेही त्यांनी या ठिकाणी अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. महिला आमदारांची भाषणे पहाता, त्यांच्या भाषणाला साहित्याची किनार असेलच असे नाही. परंतु तरी देखील ज्या वातावरणातून त्या महिला आमदार आलेल्या आहेत. त्यांचा पगडा त्यांच्या भाषेवर जाणवतो. विशेषतः ग्रामीण भागातून आलेली महिला आमदार अस्सल गावरान म्हणी, वाक्प्रचारांचा, उपमा, उपमेयांचा वापर करताना दिसून येते. असे प्रबंधकर्तीचे मत आहे. शिक्षक महिला, आमदार तर म्हणी वाक्प्रचारांचा वापर त्यांच्या भाषणात  आढळून येतो. कायद्याचा अभ्यास केलेल्या परंतु ग्रामीण भागातून आलेल्या महिला आमदारांच्या भाषणातून काही कवितांच्या अभंगाच्या ओळीही वापरलेल्या पहायला मिळतात. योग्य ठिकाणी समर्पकपणे त्या आलेल्या आहेत. पुरूष आमदार जे लेखक आहेत त्यांचे तर भाषण वाङ्मयाचा संच असलेले भाषणांचा नमुना म्हणून त्याकडे लक्ष जाते. विधानपरिषदेत तालिकासभापती म्हणूनही प्रबंधकर्तीने काम

केले आहे. तोही अनुभव एक वेगळा व महिलांनाच बोलण्यास देण्यास महिलांनाच संधी देण्यास कसा उपयुक्त ठरला यातूनही निरीक्षण केले गेले आहे.

सभागृहात सभापती, विधानसभेत अध्यक्ष, उपाध्यक्ष विधानपरिषदेत सभापती, उपसभापती व तालिका सभापती सभागृह चालवतात. प्रत्येक पक्षाचा प्रतोद असतो. तो ठरवतो कोणी कोणत्या विषयावर बोलायचे, त्यामुळे पुरूष आमदारच प्रामुख्याने प्रतोद असतात. मग ते महिलांना सांगतात तुमचा काय संबंध? उद्योगव्यवसाय, खाणी, शेती, धरणे आर्थिक धोरण यावर महिला आमदारांना बोलायला देण्याचे ते टाळतात. पुरूषप्रधान संस्कृतीचा  इथेही प्रभावी काम करत असलेली दिसून येते. अभ्यासू महिलांना कोणत्याही विषयाची मर्यादा नसते.  त्या बोलू शकतात. परंतु त्यांना संधी दिली जातेच असे नाही, आणि संधी दिलीच तर सभापती व अध्यक्ष फार कमी वेळ त्यांना देतात, तिथेही पुरूषच असतो.

एकूण या सर्व परिस्थितीचा अभ्यास करत असताना, काही गोष्टी, उणिवाही जाणवतात, अजूनही काही महिला आमदारांच्या मनात न्यूनगंड आढळून येतो. इच्छाशक्ती प्रबळ नसते. अभ्यासू वृत्ती कमी पडते. सोशल मीडिया चा योग्य वापर महिला आमदारांकडून जास्त झालेला दिसत नाही. समोरून आलेल्या प्रश्नांचा मारा त्यांना गोंधळूनही टाकतो. न डगमगता बोलणे, धाडसी बोलणे हे अजून अंगिकारले गेले पाहिजे. हे सुद्धा यातून स्पष्ट करावे वाटते.

शासनातील मंत्री म्हणून काम केलेल्या काही महिला आमदारांचे प्रभावी कामही छाप पाडून जाते, मंत्री म्हणून सारासार विचार  करून समन्वय साधून व संवेदनशील मनाची साथ घेऊन त्यांनी उत्तरे दिलेली दिसतात. पुरूष आमदारांनी कितीही खोचक प्रश्न विचारले तरी त्या प्रश्नांना उत्तरे देतांना, समजुतीचा सूर मंत्री म्हणून महिलांचा आलेला दिसतो.

प्रबंधकर्तीने या सर्व गोष्टींचा सर्वसामान्यपणे,  सर्व दृष्टिकोणातून विशेषतःवाङ्मयीन दृष्टिकोण तपासण्याचा छोटासा प्रयत्न केला आहे.

# परिशिष्ट २

सभापती महोदय,

राज्यपालांच्या अभिभाषणावर
अभिनंदन की खेद व्यक्त करावा
प्रश्न मनात पडला आहे.

अभिभाषण वाचल्यावर
अभिनंदनाची अपेक्षा असते
प्रत्यक्षातली विसंगती
खेदाचीच इच्छा धरते

मागासवर्गीयांसाठी
वाल्मिकी घरकुले
लोक आवसाने अडली आहेत
गोरगरिबांचे अश्रू त्याच्या भाळी
दडले आहेत

संत्र, कापूस, ऊस उत्पादक
कृषी – महसूलाकडे पहात आहेत
लोडशेडिंगच्या विळख्यात
बळीराजा नाडला आहे

भिवंडीच्या हातमागधारकांना
वीज माफी ठरली आहे
गरजेपोटी वीज चोरीला
सरकार शासन करणार आहे

रोजगार हमी योजनेने तर
रोजगारच हडपला आहे
आयुक्तही आरोपाच्या फेऱ्यात
तर महापौरांचा लिलाव चालला आहे

सर्व शिक्षण मोहिमेत
नाव नोंदणीच फक्त होणार आहे
खिचडी शिजवून पतंग उडविण्यात
शिक्षकांचा वेळ जाणार आहे

भ्रष्टाचार – बलात्कारासाठी

आश्रमशाळा वाढत आहेत
कायदा सुव्यवस्थेची तर
वासलातच लागली आहे

बाँबस्फोटातील आरोपी
चमत्काराने गायब होतो आहे
दिवसा ढवळ्या खून बलात्कार
तर बिअरबारमधल्या नंग्यानाचाने

महाराष्ट्राची अब्रु वेशीवार टांगली आहे
सभापती महोदय
खेदाच्याच सर्व गोष्टी
अभिनंदनाची एकच आहे

प्रजासत्ताकदिनी यंदा
महिलांनी तिरंगा फडकविला आहे
विकास कार्यात, गावाच्या प्रशासनात
सहभाग त्यांचाही वाढणार आहे

स्वजलधारा योजना केंद्राचीच आहे
अनेक कामात अनुदाने
सहज केंद्र देत आहे
तरीही खापर पुन्हा युती शासनावर फुटते

न जमणाऱ्या कामासाठी
केंद्राकडे बोट जाते
जम्बो मंत्रीमंडळाला
तंबू कमी पडतो आहे
“घर देता का हो घर”
म्हणत मंत्री वणवण फिरताहेत

एप्रिल २००४ अर्थसंकल्प अधिवेशनात पहिल्या दिवशी दोन्ही सभागृहातील सदस्यांसमोर राज्यपालांचे अभिभाषण होत असते.

राज्यपालांचे अभिभाषण म्हणजे त्या सरकारच्या कार्याचा व योजनांचा लेखाजोखा असतो. त्यानंतर दोन्ही सभागृहात राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा असते. राज्यपालांच्या अभिभाषणावर सत्ताधारी बाकावरचे सदस्य अभिनंदन करतात, तर विरोधी पक्षाचे सदस्य आपली मते त्यावर मांडत असतात. अनेकांना यावर बोलायचे असते. पक्षप्रतोद बोलणाऱ्या सदस्यांची नावे सभापतींकडे पाठवतात. पुरूष सदस्य भारंभार बोलत असतात, मग अगदी

दोन-तीन मिनिटाचा वेळ महिला सदस्यांना मिळणे अशावेळी सर्व मुद्दे घेता येत नाहीत, मग अशा वेळी योग्य मार्ग शाधावा लागतो. त्यावेळी विधानपरिषद सदस्य असणाऱ्या सौ. कांता नलावडे यांनी कवितेचा आधार घ्यायचे ठरविले व सर्व मुद्दे सामावलेली कविता त्याच क्षणी तयार केलेली सभागृहात सादर केली. फक्त दोन मिनिटात

यात गोरगरीब व मागास-वर्गीयांना मिळणारी घरकुले, संत्र, कापूस, ऊसउत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या, लोडशेडिंगचा त्रास, वीजचोरी, रोजगार हमी योजना, आयुक्तच आरोपी ठरलेत सर्वशिक्षा अभियानाचा बोजवारा, शिक्षकांना दिली जाणारी शालाबाह्य कामे, ढासळलेली कायदा- सुव्यवस्था आश्रमशाळांची दुरावस्था, बाँबस्फोटातील आरोपीना शिक्षा मिळण्यात होणार विलंब, बिअरबारमाधील नंगानाच, अशा विविध प्रश्नांवर समस्यांवर या कवितेतून त्यांनी भाष्य केले आहे.

दिलासा देणारी गोष्ट म्हणजे १९९१ ला ७३ वी, ७४ वी घटनादुरूस्ती करून स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांना ३३% आरक्षण मिळाल्यापासून २००२ पर्यंत महिला सरपंचांना २६ जानेवारी वा १५ ऑगस्टला ध्वजवंदनाचा अधिकार त्या गावातील पुरूषप्रधान संस्कृतीचा टेंभा मिटवणाऱ्या पुरूषांनी दिला नव्हता. तो स्वयंसेवी संस्थांच्या प्रयत्नाने सरकारला भान आले व त्यांनी २००३ ला असा ‘जी आर’ काढला की गावागावात ध्वजवंदना जिथे असतील तिथे महिला सरपंचच करतील. तो अधिकार या वर्षी त्यांना मिळाला, ही जमेची बाजू!

त्यावेळी केंद्रात युतीचे (एन डी ए)शासन होते, श्री. अटबिहारी वाजपेयी हे पंतप्रधान होते, त्यांनी स्वजलधारा योजना आणली होती. प्रत्येक विभागासाठी मोठ्या प्रमाणावर अनुदाने दिली होती.

तरीही न होणाऱ्या कामाचा दोष केंद्रसरकारकडे हे सरकार देत होते. मंत्रिमंडळ जम्बो होते. एवढे की सर्व मंत्र्यांना घरे देता येत नव्हती या सर्व गोष्टींचाही ऊहापोह त्यांच्या कवितेत दिसून येतो. थोडक्यात एक दीर्घ वात्रटिका, व्यंगात्मक कविता, उपमा, उपमेयांचा वापर करून सादर केलेली दिसते. त्यांची ही कविता खूप गाजली होती.

**भाषण क्र. १– कांताताई नलावडे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित)**

**बनावट नोटा प्रकरणी गुन्हेगारांविरूद्ध शासनाकडून कारवाई न झाल्याबद्दल चिंता**

महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते, “ज्याअर्थी, कराड, जि.सातारा येथे दिनांक २० डिसेंबर, २००४ रोजी लाखो रूपयांच्या बनावट नोटा चलनात आणणाऱ्या एका टोळीला पोलिसांनी अटक करणे, यापूर्वी व यानंतर सुद्धा औरंगाबाद, पुणे, मुंबई व इतर काही ठिकाणी बनावट नोटा प्रकरणी काही जणांना अटक करणे, आणि ज्याअर्थी मुंबई भागातील दहिसर येथे २१ जाने, २००३ रोजी बनावट नोटा प्रकरणी अटक केलेल्या इसमांना सत्र न्यायालयाने दिनांक १९ जानेवारी, २००५ रोजी दहा वर्षाची सक्त

मजुरी व पाच हजार दंड प्रत्येकी अशी शिक्षा फर्मावणे, याचाच अर्थ बनावट नोटा प्रकरणी तपासासाठी व त्यानंतर न्यायालयीन प्रकरणामध्ये हा विलंब होणे,

ज्याअर्थी, अजुनही बनावट नोटा प्रकरणी अटक झालेल्या अनेक गुन्हेगारांविरूद्ध कारवाई घेतलेली दिसत नाही, किंवा काही बाबतीत तपासही पूर्ण झालेला दिसत नाही, त्यामुळे बनावट नोटा तयार करणाऱ्या टोळ्या अजूनही राज्यात कार्यरत असण्याची शक्यता असणे, त्यासाठी अशी प्रकरणे गुन्हे अन्वेषण विभागाकडे सोपवून गुन्हेगारांना त्वरित अटक करण्याची आवश्यकता, सदर विषय अत्यंत महत्त्वाचा असल्याने त्याबाबत शासनाने केलेल्या अक्षम्य दुर्लक्षाबाबत हे सभागृह तीव्र चिंता व्यक्त करीत आहे."

सभापती महोदय, या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून एक भयंकर घटना मी सभागृहसमोर आणणार आहे. कराड, जि. सातारा येथे दिनांक २० डिसेंबर, २००४ रोजी बनावट नोटांच्या बाबतीमध्ये स्थानिक गुन्हे अन्वेषण पथकाने येथील बरखास्त झालेल्या भ्रष्टाचार निर्मूलन समितीचा शहराध्यक्ष श्री. राजीव नंदकुमार कदम, याच्यासह ओगलेवाडी येथील श्री. रजोंद्र चिंचकर याला अटक केली. या प्रकरणात अटक केलेल्या संशयीतांची संख्या आता ९ झालेली आहे. बनावट नोटांचे प्रकरण उघडकीस आल्या नंतर सांगली स्थानिक गुन्हे अन्वेषण पथकाने मुख्य सुत्रधार श्री. बळीराम कांबळे याला अटक केली होती. यानंतर कराड येथील श्री. संजय रंगाटे, श्री. नंदकुमार माने, ओगलेवाडी येथील रहिमान पठाण, हनुमंत जीवणे यांना अटक केली होती. एक लाख रूपयाच्या बदल्यात पाच लाख रूपयांच्या बनावट नोटा असे या बनावट नोटांचे व्यवहार आहेत. श्री. राजीव कदम याच्या डायरीमध्ये दीड लाख रूपये मुख्य संशयीत आरोपी श्री. बळीराम कांबळे याला दिल्याची नोंद केलेली आहे. यानुसार श्री. बळीरामने श्री. राजू कदमला सहा ते सात लाख रूपये किंमत असणाऱ्या बनावट नोटा दिल्या असल्याची शक्यता आहे. गुन्हा अन्वेषण पथकाने कोंडोलीचा माजी सरपंच श्री. शिवाजी माने व त्याचा मलकापूर येथील जावई श्री. संजय साळुंखे यांना सुद्धा अटक केलेली आहे. त्यांनी साडे चार लाख रुपयांच्या बनावट नोटा जाळून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे, त्या शहरामध्ये श्री. संजय साळुंखे, शिवाजी उर्फ बाबू माने यांच्या विरोधात यापूर्वी सुद्धा गुन्हा दाखल झालेला आहे. ह्या राजू कदमने निवडणूकीमध्ये ५०० रूपयाच्या नोटा वाटलेल्या आहेत. हुबेहुब वॉटरमार्कचा या ठिकाणी उपयोग केलेला आहे. साधा केळीचा व्यापारी असणारा हा श्री. राजू कदम आहे. आर.के.ग्रुप म्हणून तेथे रिक्षां युनियम आहे, त्याच्या वाढदिवसाला विशेष अंक निघतो. हा श्री. अण्णा हजारेंचा भ्रष्टाचार निर्मुलन समितीचा कराड शहर अध्यक्ष होता. त्याला पकडलेले होते. परंतु आता त्याला सोडलेले आहे. सभापती महोदय, हा भयंकर गुन्हा आहे. राजमुद्रेचा गैरवापर हा गुन्हा खरे म्हणजे केंद्र शासनाच्या अखत्यारीमध्ये येतो, त्यामुळे याबाबात सी.बी.आय. तर्फे चौकशी केली पाहिजे. याला कसे सोडून दिले जाते? हा मोठा गंभीर प्रश्न आहे. याच्यामागे कोण सुत्रधार आहे? विधानसभा निवडणुकीमध्ये हा पैसा वाटतो. काही उमेदवारांच्या बरोबर त्याचे फोटोसुद्धा वर्तमानपत्रात आलेले आहेत. त्यामुळे त्याच्यामागचा खरा सुत्रधार कोण आहे हे

सरकारने शोधून काढावे. खरे म्हणजे त्याला जामिनावर सोडायला नको होते. त्याचबरोबर औरंगाबाद, पुणे मुंबई येथे सुद्धा काही ठिकाणी  बनावट नोटा सापडलेल्या आहेत. ज्याअर्थी मुंबई, दहिसर येथे दिनांक २१ जानेवारी, २००३ रोजी बनावट नोटा प्रकरणी अटक केलेल्या इसमांना सत्र न्यायालयाने दिनांक १९ जानेवारी, २००५ रोजी दहा वर्षांची सक्त मजुरी व पाच हजार रुपये दंड प्रत्येकी अशी शिक्षा ठोठावली आहे. म्हणजे अजूनही बनावट नोटा प्रकरणी अटक झालेल्या अनेक गुन्हेगारांविरूद्ध शासनाकडून कारवाई झालेली दिसत नाही. काही बाबतीत तपासही पूर्ण झालेला आढळत नाही.  त्यामुळे बनावट नोटा तयार करणाऱ्या टोळ्या अजूनही राज्यात कार्यरत असण्याची शक्यता आहे. असे मला वाटते की, या प्रकरणाकडे अत्यंत गांभीर्याने सरकारने लक्ष देणे अत्यंत आवश्यक आहे, ह्या अक्षम्य दुर्लक्षाबाबत मी याठिकाणी चिंता व्यक्त करते.

- **विश्लेषण**

मुंबईमधील दहिसर भागात २१ जाने, २००३ रोजी बनावट नोटा प्रकरणी अटक केलेल्या इसमाला सत्र न्यायालयाने १९ जाने, २००५ रोजी १० वर्षांची सक्त मजुरी व ५००० दंड म्हणजे न्यायालयीन  प्रकरणांमध्ये स्पष्टीकरण त्यानंतरही बनावट नोटा चलनात येत असलेल्या बातम्या यावरून बनावट नोटा तयार करणाऱ्या टोळ्या अजूनही कार्यरत असण्याची शक्यता आणि त्यासाठी अशी प्रकरणे गुन्हे अन्वेषण विभागाकडे सोपवून गुन्हेगारांना त्वरित अटक करण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे सदर विषय अत्यंत महत्त्वाचा असला तरीही शासनाने केलेल्या अक्षम्य दुर्लक्षाबाबत तीव्र चिंता येथे व्यक्त केलेली आहे.

त्यानंतर श्री. अण्णा हजारेंचा भ्रष्टाचार निर्मूलन समितीचा कराड शहर अध्यक्ष राजू कदम हा साधा केळीचा व्यापारी होता. याची बनावट नोटा प्रकरण सविस्तर दाखल्यासह मांडला आहे. त्या म्हणतात राजमुद्रेचा गैरवापर हा गुन्हा केंद्रशासनाच्या अखत्यारीमध्ये येतो, त्यामुळे याबाबत सी.बी.आय तर्फे चौकशी केली पाहिजे असे असले तरी त्याला सोडून दिले कसे? हा प्रश्न विचारून ह्या प्रश्नाचे गांभीर्य त्यांनी मांडले आहे. अशा गंभीर प्रश्नाकडे शासनाचे अक्षम्य दुर्लक्षाबाबत चिंता यात व्यक्त केलेली आहे.

### भाषण क्र.  २ - श्रीमती कांताताई नलावडे

### भाषणाचा विषय - मुंबई समस्या (दि. १५.०४.२००६)

सभापती महोदय, आज या ठिकाणी मुंबईच्या अनेक प्रश्नांवर चर्चा झाली आहे. तरी, त्या चर्चेत सहभागी होण्यासाठी मी या ठिकाणी उभी आहे. सभापती महोदय, मुंबई राज्य हे देशातच नव्हे तर जागतिक स्तरावर एक आर्थिक केंद्र म्हणून गणले जात आहे. आपण जर मुंबईचा इतिहास पाहिला तर आपल्याला दिसून येईल की, मुंबईवर सातत्याने वेगवेगळ्या प्रकारची संकटे येत असतात. आणि सर्व मुंबईकर ही सर्व संकटे धाडसाने झेलत असतात. सभापती महोदय, दंगल असेल, बॉंबस्फोट असेल, वादळ असेल, अतिवृष्टी असेल, साथीचे रोग असतील, मुंबई या सर्व संकटांवर मात करून तडफपणे उभी राहते. कदाचित मला

वाटते की, मुंबई धाडसाने उभी राहते म्हणूनच की काय मुंबईवर सारखी संकटे येत आहेत. सभापती महोदय, आपण मुंबईचा इतिहास पाहिला तर, आपल्याला दिसून येईल की, मुंबईमध्ये एकूण ७ बेटे होती. त्यातील शीव-माटुंगा परळ, माझगांव, वाळकेश्वर, डोंगरी, छोटा कुलाबा, मोठा कुलाबा, माहिम, वरळी अशाप्रकारे बेटे होती. सभापती महोदय, पोर्तुगीजांनी मुंबई काबीज केली आणि मुंबईचा विकास करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला. सभापती महोदय, संपूर्ण भारताची संपत्ती मुंबईत एकवटली आहे, असे वक्तव्य सन १८९० मध्ये गोपाळ गणेश आगरकर यांनी केले होते आणि ते खरोखरच यथार्थ होते असे आता वाटत आहे. त्यानंतर मुंबईतील लोकसंख्या वाढायला लागली. कोणत्या ना कोणत्या कारणांनी बरेचसे लोक मुंबईत स्थलांतरित झाले. व्यापार करण्यासाठी, नोकरीसाठी लोक मुंबईत येऊ लागले. आपल्या येथे १९ व्या शतकापर्यंत परप्रांतीय मुंबईत स्थायिक व्हावेत म्हणून प्रोत्साहन देण्यात यायचे. मुंबईची त्यावेळची लोकसंख्या पाहिली तर आपल्याला दिसेल की, सन १८६१ मध्ये १० हजार लोकसंख्या होती, सन १८८६ मध्ये ६० हजार लोकसंख्या होती, सन १८८० मध्ये १ लाख लोकसंख्या होती, सन १९४१ मध्ये १ लाख ८६ हजार लोकसंख्या होती, सन १९३६ मध्ये २ लाख ३६ हजार लोकसंख्या होती.

सभापती महोदय १८७२ साली ६,४४,६५० लोकसंख्या, १८८१ मध्ये ७,७३,१९६ लोकसंख्या, १८९१ मध्ये ८.२१.७६४ लोकसंख्या, १९०१ मध्ये ९,२७,९९४ लोकसंख्या, १९११ मध्ये ११,४८,७५७ लोकसंख्या, १९२१ मध्ये १३,८०,४४८ लोकसंख्या, १९३१ मध्ये १४,९७,८१२ लोकसंख्या, १९४१ मध्ये १८,०१,३५८ लोकसंख्या, १९५१ मध्ये २९,९४,४४४ लोकसंख्या, १९६१ मध्ये ४१,५२,०५६ लोकसंख्या, १९७१ मध्ये ५९,७२,५७५ लोकसंख्या, १९८१ मध्ये ८२,४३,४०५ लोकसंख्या, १९९१ मध्ये ९९,२५,८९१ लोकसंख्या, २००१ मध्ये १,००,४०,००० इतकी लोकसंख्या होती. सन २००१ ची लोकसंख्या पाहिली तर राज्यभर बाहेरून येणाऱ्यांचे प्रमाण हे ५० टक्क्यांच्यावर गेलेले आहे असे आपणाला दिसून येईल. या लोकसंख्येच्या वाढीमुळे मोठ्या प्रमाणात रस्ते वाहतुकीची समस्या निर्माण होत आहे. आज मुंबईमध्ये एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जायचे म्हटले तरी खूप वेळ लागतो. याबाबत आताच सन्माननीय सदस्य श्री. गुरूनाथ कुलकर्णी यांनी सांगितले की, मला चेंबूर येथून नरिमन पॉईंट येथे येण्यासाठी जवळपास दीड ते दोन तासांचा अवधी लागतो. मी सुद्धा चेंबूर येथेच राहत आहे. अनेक वेळा तर गर्दीमुळे व ट्राफिक जॅम मुळे मुंबईमध्ये येताच येत नाही. इतर वाहतुकीच्या दृष्टीने विचार केला तर लोकल वाहतूक सुद्धा सुखकारक राहिलेली नाही. आपण रेल्वेसाठी दोन टर्मिनस तयार केलेल आहेत तर पश्चिम रेल्वेवर वांद्रा येथे व दुसरे मध्य रेल्वेवर कुर्ला येथे उभारण्यात आलेली आहेत. ही दोन टर्मिनस उभारून सुद्धा गर्दी कमी झालेली नाही. रेल्वे प्रवाशांना अतिशय त्रास होत आहे. याकडे सुद्धा लक्ष देण्याची नितांत गरज आहे. या दोन टर्मिनसचा जर आपण योग्य प्रकारे अभ्यास केला तर गर्दी कमी करण्याचा आपण प्रयत्न करू शकतो. मला असे वाटते याकडे सरकारने विशेष लक्ष दिले तर वाहतुकीच्या दृष्टीने बऱ्याच गोष्टी आपणाला करता येतील. शहाड- अंबिवली येथील

लोकलची गर्दी आपण पाहिली तर गर्दीच्या वेळी तेथून एका गाडीमध्ये सरासरी ६११२ प्रवासी प्रवास करीत असतात. हीच आकडेवारी कल्याण डोंबिवलीमध्ये २९ हजार प्रवासी इतकी आहे, ठाणे स्टेशनमध्ये ७० हजार प्रवासी इतकी आहे. घाटकोपर स्टेशनमध्ये ९० हजार प्रवासी इतकी आहे. कुर्ला स्टेशनमध्ये ७० हजार प्रवासी इतरी आहे, अशाच प्रकारचे दहिसर येथे ४५ हजार प्रवासी इतकी आहे. बोरीवली येथे ९० हजार प्रवासी इतकी आहे. अंधेरी येथे १,३६,००० प्रवासी इतकी आहे, दादर येथे १,३२,००० प्रवासी इतकी आहे, चर्चगेट येथे ९० हजार प्रवासी इतकी आहे. गर्दीच्यावेळी वढ्या मोठ्या प्रचंड संख्येने प्रवासी स्टेशनमध्ये असतात. एका लोकल ट्रेनमध्ये २००० प्रवासी  वाहतूक करण्याची क्षमता असतांना प्रत्येक वेळी ३ ते ४ हजार अतिरिक्त प्रवाशांची वाहतूक होत असते. याबाबत लक्ष देणे अत्यंत जरूरीचे आहे. मुंबईतील वाहनाचा विचार केला तर रोज मुंबईमध्ये ५० ते ६० नवीन वाहनांची नोंदणी होत असते. नवीन वाहनांची भर पडत असतांना जुने वाहन काढून टाकण्यात येत नाही. त्यामुळे प्रचंड अशी वाहतूक कोंडी होते, सन १९९०-९१ मध्ये १८५४४ नवीन वाहनांची नोंदणी झाली होती. सन १९९५-९६ मध्ये ७१ हजार वाहनांची नोंदणी झाली होती. ता ३० लाख दुचाकी वाहनांची नोंदणी आहे, १० लाख खाजगी वाहनांची नोंदणी असून ३ लाख ट्रक टेम्पो व बसेस यांची नोंदणी झालेली आहे. एवढी मोठी वाहनांची संख्या असली तरी सुद्धा रस्त्यावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण होत आहे. या दृष्टीने सुद्धा विचार करण्याची गरज आहे. ही कोंडी सोडविण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे.

➢ **विश्लेषण**

वरील भाषण दिनांक १५ एप्रिल, २००६ रोजी केलेले आहे. या भाषणात मुंबईच्या अनेक प्रश्नांपैकी काही प्रश्न येथे मांडलेले आहेत. उदा. मुंबईमधील अतिवृष्टी, मुंबईसाठी रेल्वे महामंडळ स्थापन केल्यानंतरही प्रत्यक्षात जनतेला काय मिळाले, मुंबईतील झोपडपट्ट्या धारकांच्या गंभीर समस्या, नागरीकरणाच्या प्रक्रियेती होणारा जमिनीचा अयोग्य वापर इत्यादी अनेक गंभीर स्वरूपाच्या समस्यांचा अभ्यासपूर्ण आलेखाचा या भाषणात ऊहापोह केलेला आहे. मुंबईची वाढती लोकसंख्या कशी वाढली आहे. याची आकडेवारीही त्यांनी दिली आहे. प्रवासीसंख्या दिली आहे. वाहनांची संख्या , एकूण मुंबईचा इतिहास, भूगोल, समाजरचना, वाहतूक समुद्र या सर्व गोष्टींचा मुंबईकरांवर होणारा परिणाम, वाढणाऱ्या समस्यांचा त्यांनी ऊहापोह केला आहे. म्हणूनच हे भाषण अभ्यासपूर्ण म्हणावे लागेल.

मुंबईसारख्या शहरावर सातत्याने अनेक संकटे आली, ती कधी दंगलरूपाने आली, कधी बॉम्बस्फोटाच्या रूपाने, तर कधी वादळ, अतिवृष्टी तर कधी साथीच्या रोगांच्या रूपाने या सर्व संकटांना मुंबईकराने धाडसाने झेलले.

मुंबईचा इतिहास सांगतानाही मुंबईमध्ये असलेली शीव, माटुंगा, परळ, माझगांव, वाळकेश्वर, डोंगरी, कुलाबा, माहीम, वरळी अशी सात बेटे होती. असा उल्लेख येथे भाषणात आहे. याचाच अर्थ भाषण अतिशय अभ्यासपूर्ण रीतीने तयार करून मुंबईच्या ज्या

समस्या आहेत त्यांना त्या त्या समस्यांच्या कारणांच्या मुळाशी जाऊन पद्धतशीरपणे मांडल्या आहेत.

**भाषण क्र. ३ - श्रीमती कांताताई नलावडे (विधानसभेद्वारा निर्वाचित) –**

**भाषणाचा विषय – मुंबईला अतिवृष्टीचा फटका**

सभापती महोदय, सभागृहासमोर वि.स.वि. क्रमांक १४ हे जे विधेयक मांडण्यात आले आहे, त्याबद्दल शासन खरोखरच अभिनंदनास पात्र आहे. या विधेयकावर सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आपली विस्तृत विचार मांडले आहेत. त्यांनी आपल्या भाषणातून सर्व मुद्यांना स्पर्श केला आहे. २६ जुलैच्या अतिवृष्टीचा फटका मुंबईला देखील बसला. २६ जुलैच्या अतिवृष्टीमुळे पाण्याचा निचरा योग्य प्रकारे न झाल्यामुळे मुंबई तुंबली होती. मुंबई शहरमध्ये सगळीकडे पाण्याने हाहाकार माजविला होता. यात अनेक लोक वाहून गेले होते. प्लॅस्टिक पिशव्यांच्या अतिवापरामुळे मिठी नदीचे नाल्यामध्ये रूपांतर झाले. या प्लॅस्टिक पिशव्यांमुळेच पाण्याचा निचरा होऊ शकला नाही. त्यामुळेच शासनाने प्लॅस्टिक वर बंदी घालण्याचा निर्णय घेतला. आज मुंबईत हजारो टन वेगवेगळ्या प्रकारचा कचरा वेगवेगळ्या भागातून जमा होतो. भाजीपाला, मच्छीमार्केट, रुग्णालये इत्यादी वेगवेगळ्या माध्यमातून कचरा गोळा होतो. सोसायटीमधून जमा होणारा कचरा कुंडीमध्ये कशा पद्धतीने टाकला जातो हे सर्वांना माहिती आहे. अर्धा कचरा हा कुंडीत असतो, तर अर्धा कचरा हा बाहेर असतो. शासनाने प्लॅस्टिक पिशव्यांवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. असे जरी असले तरी ५० मायक्रोन पेक्षा जाडीच्या पिशव्यांचा वापर छोट्या दुकानदारांकडून होताना दिसून येत आहे. तूप, दूध, ताक, श्रीखंड, सरबत इत्यादी आजहीप्लॅस्टिक पिशव्यांमधून मिळते. तेच प्लॅस्टिक पुन्हा कचऱ्यात जाते. सार्वजनिक ठिकाणीसुद्धा तीच अवस्था आहे. गोरेगाव येथे छोटा काश्मिर आहे. तेथे अनेक चित्रपटांचे शुटींग होते. शुटींग संपल्यानंतर तो परिसर पहावा, तेथे प्लॅस्टर ऑफ पॅरिस, बिसलेरीच्या बाटल्या व तत्सम प्लॅस्टिक कचरा पडलेला असतो. यासाठी देखील काही निर्बंध, नियंत्रण असणे आवश्यक आहे. ओला व सुका कचरा वेगवेगळा ठेवावा असे आवाहन केले असले तरी देखील ओला व सुका कचरा कोणीही वेगवेगळा ठेवत नाही. ओला व सुका कचरा एकत्रितपणे डंपिंग ग्राऊंडवर नेला जातो. सहा महिन्यांपूर्वी मुलूंड डंपिंग ग्राऊंडसंबंधातील एक बातमी आली होती. डंपिंग ग्राऊंडवर ओला व सुका कचरा टाकण्यात येत असल्यामुळे तिथल्या कुत्र्यांनी एका मुलावर हल्ला चढवून त्याला ठार केले होते.त्यामुळे डंपिंग ग्राऊंडवर सुद्धा कचरा टाकताना विचार होणे आवश्यक आहे. ग्रामीण भागामध्ये उकिरडा हा एक प्रकार असतो. त्यामध्ये जनावरांचा कचरा असेल, घरातील कचरा असेल तो टाकला जातो आणि जमा झालेला कचरा खत म्हणून शेतीमध्ये वापरले जाते.

महोदया, या विधेयकाच्या अनुषंगाने मुंबईसारख्या महानगरामध्ये प्लॅस्टिकवर बंदी आणली आहे. परंतु ही बंदी पूर्णपणे आणलेली नाही. महोदया, सोसायटी आणि झोपडपट्टी यांच्यामध्ये फार अंतर नसते. परंतु अनेकदा असे होते की, सोसायटीमधून कम्पाऊंडच्या

वरून बाहेरच्या बाजूला कचरा टाकला जातो. आपण जर सोसायट्यांच्या आजूबाजूंची पाहणी केली तर अनेक ठिकाणी प्लॅस्टिकच्या पिशव्या पहावयास मिळतील. वास्तविक पाहता हे विधेयक चांगले आहे. परंतु याची अंमलबजावणी योग्य प्रकारे झाली पाहिजे. त्यामुळे या संदर्भात कडत निर्बंध आणले पाहिजेत. जो कोणी प्लास्टीकचा वापर करेल, त्याच्यावर कडक कारवाई झाली पाहिजे. खरे म्हणजे या प्लॅस्टिकमुळे मुंबईतील पर्यावरणाचा समतोल ढासळतो आहे. त्यामुळे हा समतोल राखण्याच्या दृष्टीकोनातून कडक उपाययोजना केली पाहिजे. अनेक मुद्दे सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी मांडलेले असल्याबद्दल मी त्या मुद्यांचा पुनरूच्चार करीत नाही. हे माझे आरोग्य आहे आणि प्लॅस्टिकच्या पिशव्या माझ्या आरोग्यास घातक ठरू शकतील असा विचार आपण केला पाहिजे. त्यामुळे या संदर्भात जनजागरण करण्यासाठी सेमिनार आयोजित केले पाहिजेत, वा अन्य कार्यक्रमाच्या माध्यमातून ही बाब निदर्शनास आणून द्यावयास पाहिजे. आज प्लास्टिक बंदी असूनहीप्लॅस्टिकचा वापर होत असेल तर वापर करणाऱ्यांवर कडक कारवाई केली पाहिजे. प्लॅस्टिकवर बंदी आणत असताना कापडी पिशव्यांचाही जास्तीत जास्त प्रचार आणि वापर झाला पाहिजे, एवढीच या निमित्ताने मागणी करते व माझे दोन शब्द पुरे करते.

सन्माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छिते की, विधेयकाच्या संदर्भात आपली जी राजकीय इच्छाशक्ती आहे त्यामध्ये आम्ही सुद्धा आपल्या बरोबर आहोत. ही बंदी आणत असताना आपण मुंबईकरांमध्ये एक जाणीव निर्माण केली पाहिजे की, मुंबई माझी आहे आणि मुंबईची काळजी घेणे हे माझे कर्तव्य आहे. बाथरूमच्या खिडकीतून जो कचरा बाहेर टाकला जात आहे ते योग्य नाही. महोदया, सुशिक्षित व्यक्तीकडून सुद्धा गाडीतून जात असताना काच खाली करून, बिसलेरीची बाटली बाहेर टाकली जाते, त्यामुळे या संदर्भात नागरिकांना वळण आणि शिस्त लावणे आवश्यक आहे. माझे घर आणि माझा परिसर स्वच्छ ठेवण्याचे सर्वांनीच ठरविले तर, हे विधेयक खऱ्या अर्थाने अंमलात आणले जाईल. आपली वस्तू म्हटली की, काळजी घेतली जाते. त्यामुळे मुंबई ही आपली आहे असे गृहीत धरून, सर्वांनी काळजी घेतली पाहिजे. शिवाजी महाराज गेल्यानंतर, मोठे सेनापती असताना सुद्धा औरंगजेबाला शिवाजी महाराजांचे राज्य जिंकता आले नाही. कारण शिवाजी महाराजांनी जनतेला असे सांगितले होते की, हे तुझे राज्य आहे आणि ते तुला टिकविले पाहिजे. त्यामुळे सर्वजण हे आपले राज्य आहे असे समजून लढले, तशाच प्रकारे मुंबई आपली आहे. व आपणच ती स्वच्छ ठेवली पाहिजे ही भावना प्रत्येक मुंबईकर मनात बाणवले तरच मुंबईचा विकास होईल.

- **विश्लेषण**

मुंबईतीलच आणखी एका गहन प्रश्नावर विधानपरिषद सदस्य कांता नलावडे यांनी भाष्य केले आहे. प्लॅस्टिकवर बंदी आणणारे विधेयक ज्यावेळी सभागृहात मांडण्यात आले. त्यावेळी सरकारचे अभिनंदन करत असतानाच ही बंदी प्रामाणिकपणे झाली पाहिजे. काटेकोरपणे याची अंमलबजावणी होणे गरजेचे आहे.. २६ जुलै, २००५ ला मुंबईत

अतिवृष्टीमुळे हाहाकार माजला होता. पाणी तुंबण्याचा प्रकार प्लॅस्टिक थैल्यांमुळेच झाला होता. याकडे त्यांनी सभागृहाचे लक्ष वेधून घेतले. प्रदुषण वाढण्याचे कारणही प्लॅस्टिक आहे. प्लॅस्टिक थैल्यांचा वापर खाद्यपदार्थांसाठीही घातकच आहे. शिवाय आपण मुंबईकर स्वच्छतेच्या बाबतीत आळशी आहोत. जिथे खातो तिथेच या थैल्या टाकतो. बगीचे, चौपाट्या, छोटा काश्मिर येथे प्लॅस्टिक थैल्या, बिसलरी बाटल्या, प्लास्टर ऑफ पॅरिसचे तुकडे पडलेले असतात. याकडे लक्ष दिले पाहिजे परिसर स्वच्छता अंगी बाणवणे गरजेचे आहे. सोसायट्यांमधून जमा केलेला कचरा एकत्र ठेवला जातो. हजारवेळा सांगूनही ओला कचरा व सुका कचरा वेगळा ठेवावा. याकडे दुर्लक्ष होत आहे. डंपिंग ग्राऊंडवर भटकी कुत्री त्यामुळे वावरत असतात. पादचाऱ्यांवर हल्ला करतात. या सर्व गंभीर गोष्टी आहेत. कापडी पिशव्या बाजारात आणाव्यात, अनेक सामाजिक संस्थांना हे काम द्यावे, या नाशवंतही नसतात, दीर्घकालीन टिकतात  व स्वच्छही करता येतात. गाडीतील काच खाली करून कचरा बाहेर टाकणे व बाथरूमच्या खिडकीतून कचरा बाहेर टाकणे. या छोट्या छोट्या गोष्टीही हानीकारक आहेत. याकडे गांभिर्याने पहावे यासाठी स्वयंशिस्त आवश्यक आहे. आपल्या मालकीच्या वस्तूची आपण जीवापाड काळजी करतो, तशी मुंबई आपली आहे, तिला जपले पाहिजे हे सांगत असताना त्यांनी शिवाजी महाराजांचे उदाहरण दिले आहे. शिवरायांनी आपल्या मावळ्यांच्या मनावर हे बिंबवले होते. हे तुमचे राज्य आहे, आणि ते तुम्हीच टिकवले पाहिजे. म्हणून शिवरायांच्या निधनानंतरही  औरंगजेबाला हे राज्य जिंकता आले नाही. आपले राज्य आहे आणि ते टिकवलेच पाहिजे. या मानसिकतेमुळे औरंगजेबाचा टिकाव या मावळ्यांसमोर लागला नाही. मग मुंबई ही तुमची आहे, तुमची भाग्यविधाती आहे, तुमची रक्षणकर्ती आहे. अशी मानसिकता प्रत्येक मुंबईकराची घडविणे गरजेचे आहे. अत्यंत समर्पक उदाहरण देऊन एका सामाजिक प्रश्नावर प्रकाशझोत टाकला आहे.

**भाषण क्र. ४ - श्रीमती कांताताई नलावडे**

**भाषणाचा विषय – कृषी क्षेत्राचा विकास**

सभापती महोदय, नियम २६० अन्वये जी चर्चा या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. रणजितसिंह मोहिते पाटिल यांनी उपस्थित केलेली आहे त्या चर्चेत भाग घेण्यासाठी मी या ठिकाणी उभी आहे.

महोदया, सन्माननीय सदस्यांनी अत्यंत जिव्हाळ्याच्या प्रश्नावर ही चर्चा उपस्थित केलेली आहे. खरे म्हणजे आपला भारत देश हा कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो आणि या कृषीप्रधान देशातील अभिमानाने मिरवावे अशा प्रगतशील म्हणविणाऱ्या महाराष्ट्र राज्यात शेतकऱ्यांची जी बिकट अवस्था झालेली आहे, कर्जाच्या विळख्यात तो शेतकरी आज सापडलेला आहे हे या राज्याला भूषणावह नाही. आज राज्यात अनेक शेतकरी गळ्याला फास लावत आहेत. शेती करणे हे निव्वळ व्यवसाय नाही तर ती आपली जीवन पद्धती आहे असे समजणारा शेतकरी सर्वांच्या पोटाला अन्न देतो, शेतात काबाडकष्ट करतो आणि संपूर्ण जीवन त्या शेतीसाठी खर्ची घालोत. परंतु या शेतकऱ्यांची आज काय अवस्था आहे? त्या

अवस्थेला कारणीभूत कोण आहे? याचा कुठेतरी व केव्हातरी विचार करावाच लागणार आहे. महाराष्ट्र राज्यातील विविध भागातील शेतकऱ्यांचा विचार केला तर अनेक संकटांनी या शेतकऱ्यांना घेरलेले दिसून येईल. मग कुठल्या भागात २७००रूपये पर क्विंटल या भावाच्या आशेने लावलेल्या कापसाला शासनाच्या चुकीच्या धोरणांमुळे १२०० ते १४०० रूपयेच भाव मिळतो. कांद्याच्या बाबतीत काही महिन्यांपूर्वी २००० रूपये भाव असतांनादेखील कांद्याच्या निर्यातीवर बंदी घालण्यात आली त्यामुळे कांद्याचे भाव घसरले व कांदा उत्पादक शेतकरी आत्महत्या करायला लागले. नुकतीच लासलगांव तालुक्यातील एक बैलजोडी, जिच्या जिवावर आपण शेती करतो आपल्या धरातील एक सदस्य म्हणून मानतो अशी बैलजोडी विकल्यामुळे व ते सहन न झाल्यामुळे त्या १९ वर्षे वयाच्या मुलाने आत्महत्या केल्याचे आपण वाचले. अशा प्रकारे अत्यंत विदारक अशी परिस्थिती आपल्या राज्यात निर्माण झालेली आहे. त्याचप्रमाणे द्राक्षाची निर्यात चीनमध्ये होऊ शकते पण त्यासाठी शासनाच्या स्तरावर निश्चित असे नियोजन नसल्यामुळे ते होऊ शकत नाही. कोंकणात मागील वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे आंबा पिकाचे नुकसान झाले होते व त्यासाठी शासनाने हेक्टरी १० हजार रूपये एवढी मदत दिली होती परंतु ती मदत प्रत्यक्षात तेवढी न देता त्यात ४० टक्के एवढी कपात करण्यात आली आणि अजूनही ७०-७५ टक्के लोकांना मदत मिळालीच नाही. आंब्याला हमी भाव देण्यात यावा कोंकणात आंबा संशोधन केंद्राची उभारणी करण्यात यावी अशा प्रकारची चर्चा अनेक वेळा या सभागृहात झालेली आहे. परंतु शासन त्याबाबतीत उदासीन आहे असे मला वाटते. शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या व त्यासंबंधी जे पंचनामे केलेले आहेत त्यामध्ये मयत व्यक्तीची कौटुंबिक भांडणे, व्यसनाधिनता अशा प्रकारची वैयक्तिक कारणे दिलेली आहेत व त्यामुळे आत्महत्या होत आहेत. असे म्हटलेले असते. अशा प्रकारचे खोटे पंचनामे केले जातात व त्याची दखल घेतली.  उच्च न्यायालयाने सुद्धा ताशेरे ओढलेले आहेत आणि त्यामध्ये विजेचे भारनियमन, वीज कनेक्शन न मिळणे, मुलाचे शिक्षण, मुलीचे लग्न इ. बाबीसाठी कर्ज काढावे लागते आणि शेतातच काही उत्पन्न निघाले नसेल, शेताला पाणी नसेल, वीज कनेक्शन नसेल तर उत्पादन कोठून काढावयाचे. त्यामुळे प्रत्येक गोष्टीसाठी कर्ज काढावे लागत आहे. ॲड. निर्मलकुमार सुर्यवंशी यांनी फार सुंदर लेख लिहिला आहे. त्यात त्यांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्येवर प्रकाश टाकला आहे. शिखर सहकारी बँक कृषी कर्जाची रक्कम प्रथम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे ७ टक्के दराने हस्तांतरित करते. जिल्हा बँक प्राथमिक संस्थेकडे ती रक्कम ८.२५ टक्के दराने हस्तांतरित करते व प्राथमिक संस्था ११.२५ टक्के दराने ती रक्कम कर्ज म्हणून शेतकऱ्यांकडे हस्तांतरिक करते. अशा तऱ्हेने शिखर बँकेने ७ टक्के दराने दिलेले कर्ज शेतकऱ्यांच्या हाती येईपर्यंत त्यात ४.२५ टक्के दराची वाढ होते. जिल्हा बँक व प्राथमिक संस्थांच्या नफ्याचा भूर्दंड शेतकऱ्याला भरावा लागतो. या भूर्दंडाच्या रकमेतून बँकेच्या संचालकांची मौजमस्तीची सोय केली जाते. खरे म्हणजे आज खाजगी सावकारांपेक्षाही सहकारी बँक व संस्था अधिक क्रूरतेने कर्जवसूली करून ६० टक्क्यांवर वसुली करीत आहे. राज्यात सुका, ओला दुष्काळ पडल्यामुळे शेतकऱ्यांवर संकट येते. परंतु

शेतकऱ्यांचे आपत्तीकालापासून रक्षण करण्यासाठी आपल्याकडे एकही कायदा नाही. याचासुद्धा शासनाने विचार केला पाहिजे. या चर्चेद्वारे अनेक सन्माननीय सदस्यांनी शेतकऱ्याच्या मुलींच्या विवाहाच्या प्रश्नालासुद्धा स्पर्श केला आहे. हुंडा देणे आणि घेणे यास कायद्याने बंदी असली तरी देखील वर दक्षिणा म्हणून फ्लॅट किंवा गाडीची मागणी मुलीकडे करण्यात येते. त्यासाठी देखील शेतकऱ्याला कर्ज काढावे लागते. यावर उपाय म्हणून सामुहिक विवाहाला चालना मिळावी म्हणून यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये काही प्रमाणात निधीची तरतूद करण्यात आली आहे. गरीब शेतकऱ्यांच्या मुलींच्या सामुहिक विवाह भरविण्यासाठी वेगवेगळ्या स्वयंसेवी संस्थांना मदत केली तर या संकटातून शेतकऱ्यांची मुक्तता होऊ शकते. शेतकऱ्यांच्या सोयीसाठी डिपार्टमेंट स्टोअर्स उघडून त्यात बी- बियाणे, कीटकनाशके, एवढेच नव्हे तर जीवनावश्यक वस्तू म्हणजे तेल, धान्य वगैरे ठेवल्या पाहिजेत. वेगवेगळ्या सुविधा शेतकऱ्याला पुरविल्या तर शेतकरी सावकाराच्या दारात जाऊ शकणार नाही. ग्रामीण भागात कृषी व फळांवर प्रक्रिया करणारे उद्योग उभारण्यासाठी फार मोठ्या प्रमाणावर मदत केली पाहिजे. त्याच बरोबर जलसंवर्धनाला प्राधान्य दिले पाहिजे. तसेच वन टाईम सेटलमेंटचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. सदर योजना सोपी कशाप्रकारे करता येईल व तिचा लाभ जास्तीत जास्त शेतकऱ्यांना कशाप्रकारे देता येईल याचा विचार शासनाने केला पाहिजे. एक महिन्यापूर्वी गारपीट झाली. त्यात संत्रा व द्राक्ष बागायतदार शेतकऱ्यांचे तसेच कोकणात आंबा उत्पादक शेतकऱ्यांचे फार मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. तसेच काही भागामध्ये ज्यांनी पीक काढून शेतामध्ये ठेवले होते, अशा शेतकऱ्यांच्या पिकाचे देखील नुकसान झाले आहे.

मग त्यामध्ये तांदूळ असेल, गहू असेल, ज्वारी असेल या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. अशा परिस्थितीत शासनाकडून योग्य प्रकारे सर्व्हे झाला पाहिजे. आज सर्व्हेचे काम तलाठ्याकडे दिले जाते. अगोदरच तलाठ्याकडे कामाचा मोठा व्याप आहे, शिवाय पुन्हा सर्व्हेचे काम त्याच्याकडे सोपविले जाते. त्यामुळे त्याच्याकडून वेळेत सर्व्हे आणि पंचनामे होत नाहीत. म्हणून सर्व्हे आणि पंचनामे करण्याबाबत शासनाने स्वतंत्र व्यवस्था निर्माण केली पाहिजे अशी या चर्चेच्या माध्यमातून मला सरकारला सूचना करावयाची आहे.

महोदय, आदिवासी भागाबाबत या ठिकाणी कधीच विचार केला जात नाही. या भागातील आदिवासी शेतकरी जे उत्पादन घेतो. त्या उत्पादनाला बाजारपेठ उपलब्ध करून देण्याबाबत आपण कधी विचार करतो काय? असा विचार केला जाते नाही म्हणून आदिवासी शेतकऱ्यांच्या दृष्टिकोनातून सुद्धा विचार करणे गरजेचे आहे. या सभागृहातील सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते राज्यामध्ये शेतकऱ्यांच्या दररोज होत असलेल्या आत्महत्येसंदर्भातील बाब वारंवार सदनाच्या निदर्शनास आणून देत आहेत. वास्तविक ही खंत वाटणारी अशी गोष्ट आहे. या निमित्ताने माझी शासनाला विनंती आहे की, आत्महत्येच्या प्रश्नामध्ये राजकारण न आणता सर्वानुमते विचार केला पाहिजे. या आत्महत्या रोखण्यासाठी

सर्वपक्षीय 'स्टडी ग्रुप स्थापन' केला पाहिजे. असे केले तरच निरपेक्ष भावनेने खरोखरच शेतकऱ्यांना न्याय मिळावा आणि शेतकऱ्यांना आज ज्या संकटांना सामोरे जावे लागत आहे. ती संकटे पुन्हा येणार नाहीत याबाबत विचार करणे आवश्यक आहे. या शेतकऱ्यांच्या आयुष्याचा विचार करीत असताना ज्या मागण्या मी या चर्चेच्या माध्यमातून शासनाकडे केलेल्या आहेत त्या मागण्यांचा शासनाने गांभीर्याने विचार करावा एवढीच या निमित्ताने विनंती करते. सभापती महोदया, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपलेही आभार मानते व माझे भाषण पूर्ण करते.

## ➢ विश्लेषण

भारत हा कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. या कृषी प्रधान देशातील अभिमानाने मिरवावे अशा प्रगतीशील महाराष्ट्र राज्यात असलेल्या शेतकऱ्यांच्या बिकट अवस्थेबद्दल कांताताईंनी अतिशय उत्तम आणि अभ्यासपूर्ण भाषण येथे केलेले आहे. त्यांनी आपल्या भाषणात केवळ शेतकऱ्यांच्या दयनीय परिस्थितीचे वर्णय केलेले नाही तर ती दयनीय परिस्थिती होण्यामागच्या कारणांचा ऊहापोहही केला आहे. शेतकऱ्यांच्या संकटांचा विचार करताना त्यांच्या शेतमालाचा बाजारभावासहित उहाहरणे दिलेली आहे. उदा. २७०० रूपये पर क्विंटल या भावाच्या आशेने लावलेल्या कापसाला शासनाच्या चूकीच्या धोरणामुळे १२०० ते १४०० रूपयेच भाव मिळतो. तसेच कांद्याच्या निर्यातीवर बंदी घालण्यात आली त्यामुळे कांद्याचे भाव घसरले. या धोरणांमुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती खालावली आणि शेतकरी आत्महत्या करण्यास प्रवृत्ती झाला. एक विरोधीपक्ष सदस्या म्हणून आपली बाजू सोदाहरण त्या मांडतात आणि आपले विचार परखडपणे स्पष्ट करतात. लासलगांवातील एका शेतकऱ्याच्या १९ वर्षे वयाच्या मुलाने आत्महत्या केल्याचे सकारण उदाहरण देऊन शेतकऱ्यांच्या विदारक परिस्थितीचे चित्र आपल्यासमोर चित्रित करतात. हे मांडत असताना शासनाने जाहीर केलेल्या मदतीपेक्षा प्रत्यक्षात ४०% कपात करून मदत केली आणि त्यातही ७०-७५% लोकांना मिळालीच नाही हे ही त्या स्पष्टपणे सांगतात. कोणतीही समस्या मांडताना त्यांचे सखोल ज्ञान असणे गरजेचे असते. कांताताई स्पष्टवक्त्या आहेत. कोकणातील आंब्याच्या संबंधित असलेली शासनाची उदासीनताही त्यांनी स्पष्टपणे आणि निर्भीडपणे मांडली आहे.

ॲड. निर्मलकुमार सूर्यवंशीचा लेखाचा संदर्भ दते त्या म्हणतात शिखर सहकारी बँक जे कृषी कर्ज देते ते शेतकऱ्यांपर्यंत पोहोचेपर्यंत त्यात ४.२५% वाढ होते. जिल्हाबँक व प्राथमिक संस्थांच्या नफ्याचा भूर्दंड शेतकऱ्याला भरावा लागतो. या भुर्दंडाच्या रकमेतून बँकेच्या संचालकांची मौजमस्तीची सोय केली जाते. हे ही मांडण्यास त्या विसरत नाहीत. त्यांनी बँकांच्या कर्जाविषयीच्या धोरणामागील वास्तव उलगडून दाखवून शेतकऱ्यांच्या आत्महत्येला कारणीभूत बँकाच कशा ठरतात हे साधार मांडले आहे.

कांताताई  केवळ वास्तव मांडून मोकळ्या झाल्या नाहीत, तर त्यावर त्यांनी उपायही सुचविलेले आहेत. त्या म्हणतात, शेतकऱ्यांचे आपत्तीकालापासून रक्षण करण्यासाठी आपल्याकडे एकही कायदा नाही., याचा शासनाने विचार करावा.

शेतकऱ्याला मुलींच्या लग्नासाठी कर्ज काढावे लागते. हुंडा देणे किंवा घेणे यास कायद्याने बंदी असली तरी वरदक्षिणा म्हणून फ्लॅट किंवा गाडीची मागणी मुलीकडे केली जाते. यावर उपाय म्हणून सामुहिक विवाहाला चालना मिळावी व असे सामुहिक विवाह भरविण्यासाठी वेगवेगळ्या स्वयंसेवी संस्थांना मदत केली तर शेतकऱ्यांची मुक्तता होऊ शकते.

शेतकऱ्यांच्या सोयीसाठी बी-बियाणे, कीटकनाशके, तसेच जीवनावश्यक वस्तूंसाठी डिपार्टमेंट स्टोअर्स उघडली पाहिजेत. ग्रामीण भागात कृषी व फळांवर प्रक्रिया करणारे उद्योग उभारण्यासाठी फार मोठ्या प्रमाणावर मदत केली पाहिजे. त्याबरोबर जलसंवर्धनाला प्राधान्य दिले पाहिजे तसेच वनटाईम सेटलमेंटचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. यामुळे योजनेचा लाभ जास्तीत जास्त शेतकऱ्यांना कशाप्रकारे देता येईल याचा विचार शासनाने केला पाहिजे. वादळामुळे होणाऱ्या शेतकऱ्यांच्या परिस्थितीचे शासनाकडून योग्य प्रकारे सर्व्हे झाला पाहिजे. ह्या सर्व्हेचे काम तलाठ्याकडे न देता शासनाने त्यासाठी स्वतंत्र व्यवस्था निर्माण केली पाहिजे अशी सूचनाही त्या करतात.शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या प्रश्नामध्ये राजकारण न आणता सर्वानुमते विचार केला पाहिजे या आत्महत्या रोखण्यासाठी सर्वपक्षीय स्टडी ग्रुप स्थापन केला पाहिजे असेही त्या सूचवतात.

# परिशिष्ट ३

- **Women in the political Field**

The Political field covers the "interaction which have to do primarily with influencing and shaping the way in which authoritative allocations of values are made for a society". In this definition, three words are important and they require some elaboration. Certain values are set for a society, that is, for the members of that society to follow. These values may differ from group is group or from group to group or from nation to nation. In democratic countries it is the people who approve of them, and then they are firmly codified in the constitution of that nation. The interpretation and application to varying conditions of these accepted values is left to the judiciary and the governing authorities. The people may or may not approve of the government's application of these values which nevertheless carry the authority of the government, and in spite of the disapproval of a minority, the majority forces acceptances. All these actions and reaction are covered in the political sphere, and they emphasise the utmost importance of political activity.

There is also an increase in the percentage of women members over men – members in the VidhanSabhas of the states as far as the 1972 elections are concerned. From 4.4 per cent. In 1967 it has risen to 5.9 per cent in 1972. The above – mentioned UNESCO report comments, "One general feature of women's direct part in political leadership stands out – its extreme smallness. They are able to exert only indirect pressure, either through elections of through certain pressure groups, such as women's association"

But she is an exception, With all their dedication and independence, women – not only in India but elsewhere too –

play no significant role. The main reason, among others, as far as our country is concerned, and to a lesser extent applicable to others, is the inertia on the part of women. We have to seek means to overcome this inertia, realizing the overall importance of political activity. How far can women's organizations play their part? And how far will mass-media be effective in stirring our women from their political slumber?

- **Women in society and Politics**

History has witnessed many movements and even revolutions for Liberty, Equality, Freedom and Democracy. The French Revolution and movements for the abolition of slavery, emancipation of the working class and independence of people from colonial domination were landmarks in mankind's arduous quest for a better world. In almost all such revolutionary attempts the women's question was treated tangentially and therefor did not get adequate focus. All these radical happenings in the world passed the women by, without substantially improving their position, in society. However women's issues become a worldwide phenomenon during the eighteenth and nineteenth centuries. The low degree of their participation in socio-political matters draws the special attention of the scholars of the twentieth century.

Socialist feminists promise equal rights and opportunities to all individuals, stress economic and social rights and freedom from exploitation and priorities to the interests of the working class people. At the social point of view the socialist theory views women as the exploited class. The theory suggests that women's oppression can be ended by the total abolition of capitalist economy based on private ownership and its replacement by a communist system with service motto than the pursuit of profit. The socialist, feminists like William Thompson, The British 'Utopian' socialist; Clara Zetkin, the German Marxist, Alexandra Kollontai, the Russian Bolshevik, Charlotte Perkins, the American Socialist; all stress economic and social rights and freedom from

exploitation, Many feminists have argued that only in the context of a general movement of economic equality that the needs of all general of women, rather than those of an elite minority, can be met. For same these egalitarian goals require, can be met. For same these egalitarian goals require mixed economy and welfare provisions, goals require mixed economy and welfare provisions. The socialist feminists are against the sexual division of labour and wish the full participation of man in child rearing, and stress on the social construction of feminity and change the particular ways in which gender is constructed.

Women's rights are a form of human rights and that feminism must not be anti-men but male abuse of power which must be resisted. In short, to define the present state of feminist theory.

However only in the 1960s women's lot and the nature of gender discriminations were studied scientifically in North America and in Europe, Following this in 1955 a new discipline, 'women's studies,' was first introduced in Academic circles in the United States to study women's socio – political and cultural aspects.

In India, women's right to equal political participation including their right to vote, was accepted very gracefully much earlier than most of the Western countries. With the dawn of twentieth century there formed some women's organizations like the All India Women's Conference, the National Council for Women, etc. Women's Indian Association of Madras was founded by Margaret Cousins under the inspiration of Annie Besant (First elected women president of India National Congress -1917) Under the auspices of this organization a delegation led by Sarojini Naidu, with the support of mahatma Gandhi met Lord Morley when he visited India in 1917. It demanded equal voting rights for women along with men. That was indeed the first attempt made by women for their political rights. As a result in

1919 under the Montague – Chelmsford Reforms around ten lakh women obtained voting rights.

Madras was the first province to grant at least a limited franchise to women in 1921, followed by other provinces. Till 1926, no women ever got elected into any legislature. MuthuLekshmi Reddy of Madras, a dedicated social worker, was the first women to be nominated to the Madras Legislative Council and she was also elected as the Deputy Chairperson of the Council. KamaladeviChattopadhyaya, a pioneer in women's movement, was the first to contest a seat from the South Kanara Constituency in 1926. RadhabaiSubbaraya, Renuka Ray, AnnuSwaminathan were the earliest women who got elected to the Central Legislature.

The Government of India Act of 1935, 42 women entered in to the Legislatures of different provinces and five were nominated to the upper houses. When the Constituent Assembly was set up in October 1946 a number of women like Sarojini Naidu, DurgabaiDeshmukh, Renuka Ray and Hansa Mehta were elected to the Draft committee to frame the constitution for free India.

- **Women and Politics the National Scenario**

Politics is essentially an art of acquiring and exercising power – the power to effectively influence the decision making processes and policies, to reverse the existing situation wherever they are disadvantageous, and to bring about the necessary social changes. A participation in this exercise of power is very much a necessity, participation in this exercise of power is very much a necessity, particularly for successful democratic political institutions is requirement for the disadvantaged group, the woman, participation in political is a prerequisite and minimal requirement for successful democratic political system. Participation of women in the formal political institutions is

required for influencing the decisions for promoting women's rights and development. Direct and visible participation helps to enlarge the freedom of the social group and accelerate the pace of its advancement.

- WOMEN IN THE POLITICAL FIELD - C.A.HATE

The Political field covers the "interactions which have to do primarily with influencing and shaping the way in which authoritative allocations of values are made for a society." In this definition, three words are important and they require some elaboration. Certain values are set for a society, that is, for the members of that society to follow. These values may differ from group or from nation to nation. In democratic countries it is the people who approve of them, and then they are firmly codified in the constitution of that nation. The interpretation and application to varying conditions of these accepted values is left to the judiciary and the governing authorities. The people may or may not approve of the government's application of these values which nevertheless carry the authority of the government, and in spite of the disapproval of a minority, the majority forces acceptances. All these action and reaction are covered in the Political sphere. And they emphasis the utmost importance of political sphere, and they emphasis the utmost importance of political activity.

# इ.स १९३७ ते २०१४ आमदार स्त्रीयांची महाराष्ट्र विधानसभेतील टक्केवारी यादी

## MAHARASTRA LEGISLATIVE ASSEMBLY

Tenure –wise Percentage of Women Member Since 1937

| Sr. No. | Assembly Tenure | Total Seat of Assembly | Number of Women Members | Percentage of Women |
|---|---|---|---|---|
| 1) | 1937-1939 | 175 | 7 | 4% |
| 2) | 1946-1952 | 175 | 9 | 5.14% |
| 3) | 1952-1956 | 316 | 15 | 4.47% |
| 4) | 1957-1962 | 233 | 30 | 12.87% |
| 5) | 1962-1967 | 265 | 17 | 6.14% |
| 6) | 1967-1972 | 271 | 12 | 4.42% |
| 7) | 1972-1977 | 271 | 28 | 10.33% |
| 8) | 1978-1980 | 289 | 8 | 2.76% |
| 9) | 1980-1985 | 289 | 20 | 6.92% |
| 10) | 1985-1990 | 289 | 16 | 5.53% |
| 11) | 1990-1995 | 289 | 6 | 2.07% |
| 12) | 1995-1999 | 289 | 13 | 4.49% |
| 13) | 1999-2004 | 289 | 15 | 5.19% |
| 14) | 2004-2009 | 289 | 12 | 4.15% |
| 15) | 2009-2014 | 288 | 8 | 2.75% |
| 16) | 2014-2019 | 288 | 22 | 13% |
| | | **Total** | **216** | |

# विधानसभा व विधानपरिषदेत काम केलेल्या महिला व पुरूष आमदारांच्या कारकिर्दीचा कार्यकाळ

| अ.क्र. | नाव | कार्यकाळ |
|---|---|---|
| 1. | मा.यशवंतराव चव्हाण | १९४६ ते १९६२ |
| 2. | मा. बाळासाहेब भारदे | १९५२ ते १९७२ |
| 3. | मा. हशु अडवाणी | १९६७ ते १९७२, १९७८ ते १९८०, १९८० ते १९८५ १९९० ते १९९५ |
| 4. | मा. प्रतिभा पाटील | १९६७ ते १९८५ |
| 5. | मा. प्रभा राव | १९७२ ते १९८९, १९९५ ते १९९९ |
| 6. | मा. अंजनाबाई मगर | १९५७ ते १९६७ |
| 7. | मा.लक्ष्मी भुवड | १९६७ ते १९७८ |
| 8. | मा. मनोहर जोशी | १९९० ते १९९९, १९७२ ते १९९० |
| 9. | मा. संजीवनी रायकर | १९८८ ते २००६ |
| 10. | मा. निर्मलाताई ठोकळ | १९८२ ते १९८८(विधान परिषद), १९७२ ते १९७८ |
| 11. | मा. उषा दराडे | २००६ ते २०१२ |
| 12. | मा. प्रमोद नवलकर | १९८० ते २००६ |
| 13. | मा. आर. आर. पाटील | १९९० ते २०१४ |
| 14. | मा. निलम गोऱ्हे | २००२ ते २०१६ |
| 15. | मा. नीला देसाई | १९९४ ते २००० |
| 16. | मा. कांता नलावडे | २०००ते २००६ |
| 17. | मा. यशोधरा बजाज | १९७२ ते १९७८(विधानपरिषद) १९८० ते १९८५ (विधानसभा) १९९० ते १९९६ (विधानपरिषद) |
| 18. | मा. निर्मला भोसले | १९५२ ते १९७२ |
| 19. | मा. गोपीनाथ मुंडे | १९८० ते २००९ |

| | | |
|---|---|---|
| 20. | मा. प्रल्हाद अत्रे | १९५७ ते १९६७ |
| 21. | मा. रामदास फुटाणे | १९९६ ते २००२ |
| 22. | मा. अरविंद सावंत | १९९६ ते २००२, २००२ ते २००६ |
| 23. | मा. ना.धो. महानोर | १९७८ ते १९८४, १९९० ते १९९६ (परिषद) |
| 24. | मा. कुसुम अभ्यंकर | १९७८ ते १९८०, १९८० ते १९८५ |
| 25. | मा. ग.दि. माडगूळकर | १९६२ ते १९७४ |